महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/शअजा/ज/१७२५५
दि. १५/०१/२०२४.

# कार्यालयीन परिपत्रक

मुख्य रस्त्यापासून (९.०० मी व त्यापेक्षा जास्त रुंदीचे) मिळकतीपर्यंत ९.०० मी किंवा त्यापेक्षा जास्त रुंदीचा रस्ता उपलब्ध होत असलेल्या मिळकतीच्या टीडीआर खर्ची प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे हार्ड शीप प्रीमियम प्रकरण निहाय मा.महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने आकारणेत यावे.

१) मुख्य रस्त्यापासून (९.०० मी व त्यापेक्षा जास्त रुंदीचे) मिळकतीपर्यंत ९.०० मी किंवा त्यापेक्षा जास्त रुंदीचा रस्ता उपलब्ध होत असलेल्या मिळकतीच्या टीडीआर खर्ची प्रस्तावास मान्यता देताना रहिवासी प्रस्तावासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन पर नियमावली-२०२०नुसार मिळकतीच्या समोरील रस्त्याच्या रुंदी प्रमाणे प्रस्तावित टीडीआर क्षेत्र अधिक त्यानुसार पेड प्रीमियम क्षेत्रावर सदर मिळकतीच्या खुल्या जमिनीच्या रेडीरेकनर दराने येणा-या रक्कमेच्या ५% रक्कम Hardship Relaxation Premium Payment आकारण्यात यावे.

२) वाणिज्य वापर किंवा मिक्स वापरासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन पर नियमावली-२०२० नुसार मिळकतीच्या समोरील रस्त्याच्या रुंदी प्रमाणे प्रस्तावित टीडीआर क्षेत्र अधिक त्यानुसार पेड प्रीमियम क्षेत्रावर सदर मिळकतीच्या खुल्या जमिनीच्या रेडीरेकनर दराने येणा-या रक्कमेच्या १० % रक्कम Hardship Relaxation Premium Payment आकारण्यात यावे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका